नि.फौ.ख.क्र.१२/२०२१
सखुबाई वि. जगन्नाथ
निशाणी ३१

## दोषारोपपुर्वीचा पुरावा

## तक्रारदारतर्फे साक्षीदार क्र.२ यांची साक्ष

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** :– महादेव बाबू खिलारी
**वय** :– ६६ वर्षे, **धंदा** :– सेवानिवृत्त
**राहणार** :– शेणवडी, ता. माण, जि. सातारा.

**सरतपासणी तक्रारदारतर्फे – व्ही.बी.पाटील विद्यमान वकील यांचेमार्फत**

**०१.** सखुबाई माझी पत्नी आहे. मी माझगांव डॉक, मुंबई येथे बेचाळीस वर्षे नोकरीस होतो. मी माझ्या कुटूंबासह मुंबई येथे राहत होतो. माझ्या पत्नीचे मणक्याचे आणि अंतरअवयवाचे सन २०१७ साली शस्त्रक्रीया झाली होती. त्यामुळे माझ्या पत्नीला चालता–फिरता येत नव्हते.

**०२.** मला शेणवडी, गळवेवाडी येथे शेतजमीन आहे आणि त्या शेतजमीनी मी जाऊन–येऊन करीत होतो. दिनांक २३/०९/२००८ रोजी गळवेवाडी येथील जमीन गट क्र. १५४ मधील एकून पाच एकर क्षेत्र मी जगन्नाथ गळवे आणि संजय विठोबा माळी यांच्याकडून माझ्या पत्नीच्या नावे एका दस्ताने खरेदी केली होती. खरेदीनंतर ती जमीन पत्नीच्या ताब्यात होती व ती मी त्याची देखभाल करीत होतो. मी ती जमीन मालकी हक्काने कसत होतो. खरेदी घेतलेल्या जमीनीची महसूल दप्तरी फेरुफार क्र.१६७७ अन्वये नोंद झाली होती.

**०३.** त्यानंतर सदर फेरफार सुमित्रा ग्रामीण पतसंस्था, शाखा–पिलीव, अकलुज या पतसंस्थेचा बोजा असल्याने फेरफार क्र. १६७७ रद्द झाला. सदर नोंदीच्या विरुद्ध जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडे अपील दाखल केले.

नि.फौ.ख.क्र.१२/२०२१
सखुबाई वि. जगन्नाथ
निशाणी ३१

जगन्नाथ गळवे यांच्या नावाने पोकळ सातबारा निघत होता. सदर पोकळ सातबा–याच्या आधारे जगन्नाथ गळवे यांनी मनमंदीर बँक विटा, शाखा आटपाडी यांच्याकडे जमीन तारण ठेवली. मनमंदीर बँकेने कुठलाही सर्च रिपोर्ट न घेता, शहानिशा न करता जगन्नाथ यांना पाच लाख रुपये कर्ज दिले.

**०४.** जगन्नाथ गळवे यांनी कर्जाची परतफेड केली नाही. त्यामुळे बँकेने सदर जमीन लिलावात काढली. जगन्नाथ गळवे यांनी सदर कर्ज सन २०१४ साली घेतले होते. बँकेने लिलाव केला आणि प्रशांत विश्वनाथ पाटील यांना बोगस कागदपत्रे तयार करुन त्यांच्या नावे खरेदीपत्राचा दस्त तयार करुन दिला. खरेदीखताच्या दस्तासोबत खोटी प्रतिज्ञापत्रे आणि कागदपत्रे जोडली होती. त्या सर्वांनी कटकारस्थान करुन शेतजमीन विक्री केली व आमची फसवणूक केली. आरोपी जगन्नाथ याला माझ्याबरोबर झालेल्या व्यवहाराची माहिती होती. सर्व आरोपींना कायदेशीर कारवाई व्हावी.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे – श्री.ए.डी. वसेकर, विद्यमान वकील यांनी राखीव ठेवला.</u>**

श्रवणोत्तर स्विकृती,
समक्ष,

RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2025.06.24 13:58:30 +0530

दि. २४/०६/२०२५
आटपाडी.

( आर. बी. कुलकर्णी )
सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
आटपाडी